आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१२ मे २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान उद्या /१ हजार ७१७ उमेदवारांचं भवितव्य होणार मतदान यंत्रात बंद

- ओदिशा विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदानही उद्या होणार

- जोपर्यंत मोदी आहेत तोपर्यंत कोणीही नागरिकत्व सुधारणा कायदा रद्द करू शकत नाही असं भाजपाच्या प्रचारसभेत ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- छत्रपति संभाजीनगर मधे निवडणूक आयोगाचं पथक आणि पोलीसांच्या संयुक्त कारवाईत ३९ लाख रुपयांची रोकड जप्त

- भारतीय कुस्तीपटू अमन सहरावत पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र

**आणि**

- देशाच्या विविध भागात पुढचे काही दिवस धुळीची वादळं आणि पाऊस येण्याची शक्यता

**<><><><><><>**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१२ मे २०२४ - रविवार

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान उद्या होणार असून त्यादृष्टीनं निवडणूक आणि प्रशासकीय यंत्रणेची तयारी चालू आहे. या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ मतदारसंघांचा समावेश आहे. आंध्र प्रदेशात सर्व २५, तेलंगणात सर्व १७,उत्तरप्रदेशात १३, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगालमधे प्रत्येकी ८ बिहारमधे ५, झारखंड आणि ओदिशामधे प्रत्येकी ४ ठिकाणी मतदान होणार असून जम्मू काश्मीरच्या केंद्रशासित प्रदेशात एका मतदारसंघात मतदान होईल. देशभरात १ हजार ७१७ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रात बंद होईल. महाराष्ट्रात पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद आणि बीड इथं उद्या मतदान होणार आहे. राज्यात या टप्प्यात एकूण २९८ उमेदवार नशीब आजमावत आहेत.

**<><><><><>**

चौथ्या टप्प्यातला प्रचार काल संपला. सर्वच पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी आपापल्या उमेदवारांसाठी जोरदार प्रचार केला. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शहा, नितीन गडकरी इत्यादींनी प्रचारसभा घेतल्या तसंच रोड शो केले. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी काल नंदुरबार मधे प्रचारसभा घेतली.

**<><><><><>**

ओदिशामध्ये उद्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात २८ जागांसाठी मतदान होणार आहे. यासाठी २४३ उमेदवार रिंगणात आहेत. ओदिशा विधानसभा निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यातलं मतदान २० मे, २५ मे आणि १ जून रोजी होणार असून मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे.

<><><><><>

जोपर्यंत मोदी आहेत तोपर्यंत कोणीही नागरिकत्व सुधारणा कायदा रद्द करू शकत नाही किंवा धर्माच्या आधारावर आरक्षण देऊ शकत नाही, असं प्रधानमंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधे बराकपूर इथल्या सभेत बोलताना सांगितलं. लोकसभा निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यांसाठी आज त्यांच्या सभा पश्चिम बंगालमध्ये विविध ठिकाणी होत आहेत.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी काल मुंबईत काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतल्या.

<><><><><>

आपल्या सरकारनं गेल्या दहा वर्षांमध्ये गरिबांना सक्षम करण्यावर तसंच त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर दिल्याचं प्रधानमंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रत्येक नागरिकाला सक्षम केल्यानं आणि त्यांना यशस्वी होण्यासाठी लागणारी साधनं उपलब्ध करून दिल्यानं खराखुरा विकास घडून येतो, हे भारतानं जगाला दाखवून दिलं आहे, असं त्यांनी एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या

मुलाखतीत सांगितलं. गेल्या दहा वर्षात २५ कोटी जनता गरिबीतून बाहेर आल्याचं ते म्हणाले.

भारतातलं बेरोजगारांचं प्रमाण जगात सर्वात कमी असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. कोट्यवधी नागरिकांनी स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी मुद्रा कर्जाचा लाभ घेतला, हे पहिल्यांदाच घडलं आहे. आपल्या सरकारनं मजबूत अर्थव्यवस्था उभारली असून त्यामुळे भारताच्या आगामी २५ वर्षांचा पाया घडला आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘मुंबई उत्तर’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये विजापूर जिल्ह्याच्या पिडिया जंगलात शुक्रवारी पोलीसांसोबत झालेल्या चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटल्याची माहिती विजापूरचे पोलीस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी दिली. हे सगळे जण पीपीसीएम या संघटनेचे सदस्य होते. पलनार आणि मुतवेंडी कॅम्पवर हल्ला करण्याची योजना त्यांनी आखली होती अशी माहिती यादव यांनी दिली. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांवर ३० लाख रुपयांच्यावर बक्षीस

होतं, यांपैकी दोघांवर प्रत्येकी आठ लाख, दोघांवर प्रत्येकी पाच लाख, इतर दोघांवर प्रत्येकी दोन लाखांचं बक्षीस होतं असं त्यांनी सांगितलं.

या चकमकीत एक स्थानिक ग्रामस्थही जखमी झाल्याची माहिती यादव यांनी दिली.

<><><><><>

छत्रपति संभाजीनगर मधे निवडणूक आयोगाचं पथक आणि पोलीस यांनी संयुक्तरित्या एका मोबाईल फोनच्या दुकानावर काल रात्री छापा घालून ३९ लाख रुपयांची रोकड जप्त केली. नोटा मोजण्याच्या मशीनसह चार आरोपीही यावेळी हाती लागले असून त्यांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरु आहे.

<><><><><>

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं नवीन लिक्विड रॉकेट इंजिनची यशस्वी चाचणी केली आहे. ॲडिटीव्ह मॅन्युफॅक्चरींग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तामिळनाडूतल्या महेंद्रगिरी इथं ९ मे रोजी ही चाचणी घेण्यात आली. इंजिनची एकसंध बांधणी केल्यामुळे १९ सांधे काढण्यात आले. यामुळे प्रति इंजिन कच्च्या मालाच्या वापरात घट झाली आहे. यात वापरल्या जाणाऱ्या मेटल पावडरची साडे पाचशे किलोची बचत होणार आहे. तसंच उत्पादन वेळेतही बचत होणार आहे, असं इस्त्रोनं सांगितलं.

<><><><><>

जगभरात आज मदर्स डे साजरा होत आहे. अमेरिकेत वेस्ट व्हर्जिनियामधल्या ग्रॅफ्टन इथल्या चर्चमध्ये १९०८ साली ॲना जार्विस यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ सभेचं आयोजन केलं होतं, तेव्हापासून जगभरात मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी हा सण साजरा केला जातो. यानिमीत्तानं जगभरातली मुलं आपल्या आईच्या अस्तित्वाची दखल घेत, तीनं घेतलेल्या कष्टांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत हा दिवस साजरा करतात.
सर्व वयोगटातले नागरिक फुलं, शुभेच्छाकार्ड आणि इतर भेटवस्तू देऊन आपल्या आईबद्दल प्रेम आणि आदर व्यक्त करत आहेत.

<><><><><>

कुस्तीपटू अमन सहरावत याची यावर्षी होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तुर्किये इथं झालेल्या सामन्यात ५७ किलो वजनी गटात अमनने कोरियाच्या हाँगसोंग हान याचा १२-२ असा पराभव केला. यावर्षी ऑलिम्पिकसाठी निवड झालेला तो पहिला पुरुष कुस्तीपटू ठरला आहे. आतापर्यंत पाच महिला कुस्तीपटूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत स्थान पटकावलं आहे.

<><><><><>

ओडिशातील भुवनेश्वर इथं आजपासून राष्ट्रीय महासंघ वरिष्ठ ॲथलेटिक्स स्पर्धा सुरू होत आहे. या स्पर्धेत भालाफेकपटू नीरज चोप्रा आज आपल्या कामगिरीचं दर्शन घडवणार आहे. जेस्विन अल्ड्रिन,

तेजिंदरपालसिंग तूर, अमोज जेकब, मुहम्मद अजमल हे खेळाडूही या स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

उत्तराखंडमधल्या बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे आज पहाटे सहा वाजता उघडण्यात आले. या वेळी मंदिराची फुलांनी सजावट केली होती. भाविकांना दर्शन घेता यावं यासाठी मंदिर प्रशासनाकडून सोय करण्यात आली आहे. यापूर्वी केदारनाथ, यमुनोत्री आणि गंगोत्रीचे दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे आता चारही धाम भाविकांना दर्शनासाठी खुले झाले आहेत.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी इथे मेफेड्रोन हा अंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी दोन जणांना अटक केली आहे. या मेफेड्रोन ची किंमत अंदाजे ८ लाखांहून अधिक आहे. मोहम्मद सुदेश अबुसाहेब अन्सारी आणि विकास दिनेश गुप्ता अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

**<><><><><>**

देशाच्या वायव्य पूर्व मध्य आणि दक्षिण भागात धुळीच्या वादळांसह विजांचा कडकडाट आणि पावसाच्या सरींची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. पुढचे ३ दिवस ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. येत्या मंगळवारपर्यंत **मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि छत्तीसगड** मधे गारपिटीची शक्यता वर्तवली आहे.

महाराष्ट्रात काल अनेक ठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लावली. यावेळी झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला, तर अनेक ठिकाणी फळबागांचं नुकसान झालं.

**बीडमध्ये** धारूर शहरात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. वादळामुळे बीएसएनएलचा टॉवर घरांवर कोसळल्यानं एका मुलगी दगावली तर चार जण जखमी झाले. अंबाजोगाईतही  वीज कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

**ठाणे** शहरातही काल रात्री पावसाच्या हलक्या सरी बरसल्या.

**//<><><><><><>//**